जा.क्र.प्राफसंके/लुपिन/ १०६ /२०२०
प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला
दिनांक :–०६/०३/२०२०

प्रति,

____________________

____________________

____________________

विषय :– कोकणातील दुर्लक्षित औषधी वनस्पतींचा माहितीपट तयार करण्यासाठी येणाऱ्या खर्चाचे दरपत्रक पुरविणेबाबत...

महोदय,

प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला येथे ''कोकणातील दुर्लक्षित औषधी वनस्पतींचे संवर्धन आणि दर्जेदार रोपे/कलमे निर्मिती'' या प्रकल्पांतर्गत माहितीपट तयार करण्याकरिता येणाऱ्या खर्चासाठी हे कार्यालय आपणांकडून दरपत्रक मागवित आहे. सदर दरपत्रक दिनांक २०/०३/२०२० पूर्वी/पर्यंत कार्यालयीन वेळेत कृपया बंद पाकीटातून खाली सही करणार यांचे नावे पाठवावे.

| अ. क्र. | करावयाचे काम | कामाचा तपशिल |
|---|---|---|
| १ | माहितीपट तयार करणे (८ ते १० मिनिटे) | प्रकल्पांतर्गत समाविष्ट दुर्लक्षित पिकांचे छायाचित्र (Photos) काढणे, अनुषंगीक चित्रफिती (Videos) करणे व पार्श्वध्वनीद्वारे माहिती समाविष्ट करणे, आवाजाद्वारे परिणामकारकता साधणे (Sound effect) व या सगळयांचे सुयोग्य संपादन (Editing) करणे. |

१ दरपत्रकात सर्व करांचा उल्लेख असावा.
२ सदर माहितीपट करण्याकरिता विविध गावांमध्ये सुरंगीच्या वाढीच्या वेगवेगळया अवस्थांमध्ये वेळोवेळी जाऊन छायाचित्रण करणे आवश्यक आहे.
३ बंद पाकिटावर **'माहितीपट तयार करणे – लुपिन प्रकल्प'** असा स्पष्ट उल्लेख असावा.
४ अंतिम तारखेनंतर प्राप्त दरपत्रकांचा या कार्यालयाकडून विचार केला जाणार नसून झालेल्या विलंबास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.
५ कार्यालय कोणतेही कारण न देता आपल्या एकमेव स्वेच्छाधिकारावर हे दरपत्रक रद्द करण्याचा/मागे घेण्याचा/दुरूस्त करण्याचा किंवा नियत तारीख वाढविण्याचा अधिकार राखून ठेवीत आहे.
६ दरपत्रक सादर करताना दरपत्रक धारकाने CST/Maharashtra VAT/GST क्रमांक नमुद करावा. तथापि CST/Maharashtra VAT/GST क्रमांक लागु नसल्यास तत्सम प्राधिकरणाकडील नोंदणी क्रमांक असलेल्या लेटरहेड दरपत्रक सादर करावे.
७ सदर दरपत्रकासोबत पॅनकार्ड जोडावे.

आपला विश्वासू,

सहयोगी संशोधन संचालक,
प्रादेशिक फळ संशोधन केंद्र,
वेंगुर्ले. जि.सिंधुदूर्ग.